मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३। पान १

# भावी पिढीला ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटातून वाचण्यासाठी 'ग्रीन सोसायटी'चाच पर्याय : गव्हाणे

## पर्यावरणविषयक जनजागृती मेळाव्यात ४०० पेक्षा जास्त सोसायट्यांचा सहभाग

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

सध्या संपूर्ण जगावर ग्लोबल वॉर्मिंगचे सावट आहे. जागतिक तापमानवाढीवर पर्यावरणपूरक उपाययोजनाच प्रभावी ठरू शकतात. त्याची सुरुवात सजग नागरिकांनी स्वतःच्या सोसायट्यांमधूनच करायला हवी. भावी पिढीला सुसह्य वातावरण आणि स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी 'ग्रीन सोसायटी'ची संकल्पना अंमलात आणावी लागेल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी मोशी येथे व्यक्त केले. डी. आर. गव्हाणे डेस्टिनेशन्स आणि रोटरी ग्रीन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनासाठी आणि पर्यायाने ग्लोबल वॉर्मिंगचे संकट टाळण्यासाठी हाऊसिंग सोसायट्यांसाठी



जनजागृतीपर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. मोशी येथील भारत माता चौक येथील जय गणेश लॉन्स येथे रविवारी (दि. २९) हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी मेळाव्याला व्हिडिओद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी रोटरी डीस्ट्रिक ३१३१ चे केशव ताम्हणकर, को डायरेक्टर रो. संतोष जोशी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, कविताताई अल्हाट, विक्रांत लांडे, श्याम लांडे, पंकज भालेकर, संजय नेवाळे, राहुल भोसले, विनया तापकीर, वसंत बोराटे, विनायक रणसुभे, प्रदीप तापकीर, विकास साने, चंद्रकांत वाळके, मयुर कलाटे, मंदा आल्हाट, विजय लोखंडे, प्रकाश सोमवंशी, माया बारणे, अतिष बारणे, विशाल आहेर गिरिष ब्रम्हे आदी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमासाठी भोसरी, मोशी परिसरातील विविध ५०० पेक्षा अधिक सोसायटीच्या नागरिकांची उपस्थिती होती. पाणी आणि विजेची बचत करणे तसेच कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. सोसायटीमधील पाण्याचा अपव्यय कमी करणे, सोसायटयांना सोलर हीटर किंवा सोलर लाइट्ससाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, सोसायटीमधील ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे कमी खर्चामध्ये विघटन करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे रोटरीयन केशव ताम्हणकर यांनी सांगितले. सेतू प्रकल्पांतर्गत आपल्या सोसायट्यांमध्ये कमी खर्चात पर्यावरणपूरक गोष्टी कशा राबवता येतील यावर या मेळाव्यात चर्चा झाली. पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी व्हिडिओद्वारे प्रसारित संदेशात म्हटले की, कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्याचे खत आणि सुक्या कचऱ्याचे रिसायकलिंग करण्याचा प्रयत्न सोसायट्यांमधून केला जात आहे. पिंपरी चिंचवडमध्ये महानगरपालिकेच्यावतीने 'कूल रुम पॉलिसी' राबविण्यात येणार आहे.

### भावी पिढीला स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी समाजकारणावर!

» राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी मेळाव्यात आपली भूमिका मांडताना राजकारणाबरोबर समाजकारणावर आपला नेहमीच भर असल्याची ग्वाही दिली. ग्लोबल वॉर्मिंगपासून विशेषतः भावी पिढीला वीज, पाणी याच्या कमतरतेचा मोठा धोका उद्भवू शकतो. त्यांना स्वच्छ पर्यावरण, शुद्ध हवा, स्वच्छ पाणी मिळवून देणं हे आपले कर्तव्य आहे. याची सुरुवात स्वतःपासून, आपल्या सोसायटीपासून करायला हवी. सोसायट्यांमधून जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्यात भोसरी, मोशी परिसरातील ५०० पेक्षा अधिक सोसायट्यांच्या सहभागामुळे निश्चितच पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने पाऊल उचलले गेल्याचे गव्हाणे म्हणाले. यापुढेही समाजाच्या भल्यासाठी आपण कामं करत राहू, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये नवीन आयटी पार्क निर्मितीचा 'संकल्प'!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

औद्योगिकनगरी, ऑटो हब, आयटी हब म्हणून नावारुपाला आलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये नवीन आयटी पार्क विकसित करण्याचा 'संकल्प' करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या आयटी पॉलिसीचा अभ्यास सुरू असून, या धोरणानुसार पहिला प्रकल्प मोशी-चऱ्होली- चिखली या झपाट्याने विकसित होणाऱ्या समाविष्ट गावांमध्ये व्हावा, याकरिता भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. राज्यात पहिले माहिती



तंत्रज्ञान आणि सहाय्यभूत सेवा धोरण १९९८ मध्ये तयार केले होते. या धोरणाचे योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे या क्षेत्रात निर्यात तसेच गुंतवणुकीतील सातत्यपूर्ण वाढ झाली. यामुळे राज्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा पाया मजबूत झाला. आजच्या घडीला महाराष्ट्र हे आशिया खंडातील सर्वोत्तम तंत्रज्ञान गुंतवणूक स्थळांपैकी एक आहे. या पार्श्वभूमीवर कालानुरूप बदल करीत राज्य सरकारने नवीन माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण- २०२३ तयार केले आहे असून, त्यावर हरकती व सूचना मागविल्या आहेत.

राज्याच्या नवीन आयटी- २०२३ धोरणाची पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आमदार महेश लांडगे, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि क्रेडाईचे सदस्य बांधकाम व्यावसायिक अरविंद जैन यांच्यात सकारात्मक चर्चा झाली.

> " राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण क्षेत्रामध्ये आगामी काळात ९५ हजार कोटी रुपयांची नवीन गुंतवणूक आकर्षित करण्याचे ध्येय आहे. त्यामुळे राज्यात ३.५ दशलक्ष एवढ्या नवीन रोजगार संधी निर्माण होतील, असे धोरण आहे. लवकरच क्रेडाई, बांधकाम व्यावसायिक संघटना, पिंपरी-चिंचवड महापालिका अधिकारी व लोकप्रतिनिधी अशी बैठक घेण्याची मागणी केली आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# मराठा आरक्षण : मनोज जरांगे पाटलांना पाठिंबा देण्यासाठी भोसरीत एक दिवसीय लाक्षणिक उपोषण

## आंदोलनात माजी आ.विलास लांडे यांचा सक्रिय सहभाग

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मराठा आरक्षणासाठी संपूर्ण शासन व्यवस्थेसमोर खडे ठाकलेले मनोज जरांगे पाटील यांनी संपूर्ण राज्यातील वातावरण ढवळून काढले आहे. मराठा आरक्षणासाठी राज्यभर साखळी उपोषण केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून भोसरी गाव येथे आज (दि.२९) एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी माजी आमदार विलास लांडे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी भोसरीत




एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या ठिकाणी माजी आमदार विलास लांडे यांनी उपस्थित राहत सक्रिय सहभाग नोंदवला.

यावेळी विलास लांडे म्हणाले, जरांगे पाटील नावाच्या माणसाने महाराष्ट्र हादरून सोडला आहे. त्यांचा आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. सरकार, मंत्रिमंडळ अस्वस्थ आहे. प्रत्येक मराठा तरुण मागील अनेक वर्षांची खदखद रस्त्यावर घेऊन उतरत आहे. या आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील हे संपूर्ण मराठा समाजाच्या गळ्यातील ताईत बनले आहेत.

जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या आंदोलनासमोर सरकारला गुडघे टेकवावेच लागतील. त्यानंतर आरक्षणही मिळेल. पण जरांगे पाटील यांनी मागील चार दिवसांपासून अन्न पाणी वर्ज्य केल्याने माझ्यासारखा कार्यकर्ता अस्वस्थ आहे. जरांगे पाटील यांनी तब्बेतीला जपून महाराष्ट्रातील तरुणांना दिशा द्यावी. महाराष्ट्रातील मराठा बांधवांना विश्वासार्ह चेहरा कित्येक वर्षांनी सापडला आहे. अशा नेतृत्वाला आम्हाला गमवायचे नाही.

# शहरी वाहतुकीत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पालिकेला प्रथम पारितोषिक

## आयुक्त शेखर सिंह यांनी हा पारितोषिक स्वीकारला

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयाने अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फरन्स २०२३ साठी शहरी वाहतूक विभागांमध्ये नाविन्यपूर्ण विषयांवर काम करणाऱ्या महानगरपालिका, मेट्रो कार्पोरेशन, बस कार्पोरेशन यांच्याकडून प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भारतातील अनेक शहरांमधून पिंपरी चिंचवड शहराची निवड होऊन प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस बहाल करण्यात



आले. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी हा पारितोषिक स्वीकारला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने (झळाॲळ) विना वाहन वापर ( एन एम टी ) धोरणास आणि पिंपळे सौदागर परिसर, सांगवी- किवळे रस्ता व नाशिक – फाटा वाकड रस्ता यावरील सायकल मार्ग व पादचारी मार्ग इत्यादी पूरक सुविधांचा अहवाल केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाकडे सादर केला होता. त्याआधारे हा पारितोषिक भारत सरकारच्या शहरी विकास मंत्रालयचे सचिव मनोज जोशी यांच्या हस्ते आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिल्ली येथील माणिक शॉ सेंटर येथे आयोजित केलेल्या १६ व्या शहरी वाहतूक विकास परिषदेत स्वीकारला. यावेळी समारंभाच्या वेळी महापालिकेच्या वतीने प्रकल्प विभागाचे सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, उप अभियंता सुनील पवार, आयटीडीपीचे प्रांजल कुलकर्णी तसेच डिझाईन शाळा चे संचालक आशिक जैन उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाबाबत न्यायालयात मांडणी न केल्याची चौकशी आवश्यक!

## स्वतंत्र चौकशी करण्याची शंभूराज देसाई यांची मागणी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भाजप-शिवसेना युती सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण दीड वर्षे उच्च न्यायालयात टिकले. पण, सर्वोच्च न्यायालयात ते का टिकले नाही, याच्यावर कोणीही चर्चा करत नाही. मी कोणाकडे बोट दाखवत नाही. परंतु, दीड वर्षे चाललेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात रद्द झाले. त्यावेळी कोणत्या गोष्टी मांडायच्या राहिल्या, गांभीर्याने न्यायालयापुढे का मांडल्या गेल्या नाहीत, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी उत्पादन शुल्क मंत्री, मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य शंभूराज देसाई यांनी केली. देसाई यांना बालेवाडी येथे पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. देसाई म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण थांबवताना ४० दिवसांचा कालावधी दिला होता. या ४० दिवसात सरकारने आरक्षणावर काम केले आहे. निजाम राजवटीत ज्यांच्याकडे कुणबी दाखले होतेस त्यांना दाखले देण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने दहा हजाराच्या आसपास पुरावे गोळा केले आहेत. त्याची तेलंगणा सरकारकडून खात्री करून घेतली जाणार आहे.




राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले आहेत. परंतु सध्या तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. त्यामुळे तेलंगणा सरकारकडून मराठा समाजातील नोंदीसंदर्भातील कागदपत्रे मिळण्यास अडचण येत आहे. यासंदर्भात लवकरच तोडगा निघेल. कागदपत्रे मिळविण्यासाठी अडचण येत असल्याने समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी अद्यापपर्यंत २३ बैठका घेतल्या आहेत. सोमवारी पुन्हा मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आहे. आम्ही मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देऊ, जरांगे पाटील यांच्याशी चर्चेला सरकार तयार आहे. लोकांच्या तीव्र भावना पुढे आल्या तेव्हा आम्ही स्वतः आमचे कार्यक्रम थांबविले आहेत. कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण द्यायचे आहे, असेही देसाई म्हणाले. -सारथी मार्फत सुरू केलेल्या प्रशिक्षण केंद्रातील ५१ विद्यार्थी भारतीय लोकसेवा आयोग आणि ३०४ विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण -छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजनेतून गेल्यावर्षी ३२ हजार ५३९ विद्यार्थ्यांना ३१ कोटी, यंदा आत्तापर्यंत ४४ हजार १०२ विद्यार्थ्यांना ४२ कोटी रुपये -डॉ.पंजाबराव देशमुख योजनेअंतर्गत ३ लाख ७९ हजार ३७३ मराठा विद्यार्थ्यांना १ हजार २९३ कोटी रुपये वसतिगृह भत्ता -अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत ७० हजार मराठा तरुण, तरुणींना विविध बँकांमार्फत बिनव्याजी पाच हजार १६० कोटी रुपयांचे भांडवल.

### समितीला दोन महिन्यांची मुदतवाढ

» नोज जरांगे पाटील यांनी उपोषण थांबवताना ४० दिवसांचा कालावधी दिला होता. या ४० दिवसात सरकारने आरक्षणावर काम केले आहे. निजाम राजवटीत ज्यांच्याकडे कुणबी दाखले होतेस त्यांना दाखले देण्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीने दहा हजाराच्या आसपास पुरावे गोळा केले आहेत. त्याची तेलंगणा सरकारकडून खात्री करून घेतली जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले आहेत. परंतु सध्या तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे.

# मराठा आंदोलक तापले, संजय राऊतांशी भिडले!

## मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न उपस्थित

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** करे गटाचे खासदार संजय राऊत आज दौंड दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर जोरदार हल्ला चढविला. राऊत यांची पत्रकार परिषद संपल्यानंतर मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

चले जाओ, चले जाओ संजय राऊत चले जाओ राऊत.. एक मराठा लाख मराठा.. छत्रपती शिवाजी महाराज की..जय भवानी जय शिवाजी.. जरांगे पाटील आगे बढो हम तुम्हारे साथ है.. आरक्षण आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं..अशा जोरदार घोषणाबाजी करून संजय राऊत यांना जोरदार विरोध करण्यात आला. मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर



मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सर्व राजकीय पक्षातील नेत्यांना गाव बंदीचे आवाहन केले आहे. त्यानुसार मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून कोणत्याही राजकीय नेत्याला गावात येण्यापासून विरोध केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर आज संजय राऊत दौंड येथे दौऱ्यावर आले असता. मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांना विरोध दर्शविण्यात आला आहे. दरम्यान राऊत यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकांसाठी तुरुंगात असलेले कैदी बाहेर काढले जात असल्याचा आरोप केला आहे. तसेच कैद्यांना जेलमधून बाहेर काढून त्यांना राजकारणात आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप राऊत यांनी केला आहे. गृहमंत्र्यांनी त्यांच्या नेत्यांचे एक पथक नेमले असून गुन्हेगारांना जामिनावर बाहेर काढण्याचे काम सरकार करत आहे. तसेच कोणता पोलीस अधिकारी जामिनावर सुटून सरकारसाठी काम करत आहे.

# आळंदीत मराठा आरक्षणासाठी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन!

## सव्वा तासाने आंदोलकाला खाली उतरवण्यास प्रशासनाला यश



### या प्रकाराने वाहतुक कोंडी

» आळंदीतील युवक श्रीकांत काकडे याने लक्ष वेधण्यासाठी पालिकेच्या पाण्याच्या टाकीवर चढुन स्वताचा व्हिडिओ काढला. हा व्हिडिओ व्हारल झाल्याने आंदोलक आणि पोलिस प्रशासनाची पळापळ झाली.दुपारी चारच्या दरम्यान भर मध्यवस्तीत हा प्रकार झाल्याने खळबळ माजली. बघ्यांची गर्दी वाढली. वाहतुक कोंडी झाली. एरवी पावत्या फाडणारे वाहतुक पोलिस मात्र आज गायब होते. आळंदी पोलिस ठिण्यातील पोलिस निरीक्षक, आणि माजी नगरसेवक डी डी भोसले यांनी काकडे याला समजावुन खाली उतरवले. आणि सर्वांच्या मनातील धाकधुक संपली.

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आरक्षण मिळावे यासाठी दोन दिवसापुर्वी लातुर जिल्ह्यातील उमरदरा येथिल पासष्ट वर्षिय माजी सरपंच व्यंकट नरसिंग ढोपरे यांनी इंद्रायणीत आत्महत्या केली.त्यानंतर आज चार वाजण्याच्या सुमारास आळंदीतील श्रीकांत जयसिंग काकडे तरुणाने पाण्याच्या टाकीवर चढुन शोले स्टाईल आंदोलन केल्याचा प्रकार आळंदीत झाला.तब्बल सव्वा तासाने आंदोलक काकाडे याला खाली उतरवण्यास पोलिस प्रशासनाला यश आले. मराठा आरक्षणसाठीच्या जरांगे पाटलांच्या लढ्याला बळ देण्यासाठी आळंदी आणि परिसरातुन सकल मराठा समाजाच्यावतीने बुधवारी (ता.२५) पासुन बेमुदत साखळी उपोषण आळंदीत सुरु आहे. आज दिवभर विविध संघटना तसेच परिसरातील मराठा बांधव आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आंदोलनस्थळी भेट देत होते. दरम्यान आळंदीतील युवक श्रीकांत काकडे याने लक्ष वेधण्यासाठी पालिकेच्या पाण्याच्या टाकीवर चढुन स्वताचा व्हिडिओ काढला.हा व्हिडिओ व्हारल झाल्याने आंदोलक आणि पोलिस प्रशासनाची पळापळ झाली.दुपारी चारच्या दरम्यान भर मध्यवस्तीत हा प्रकार झाल्याने खळबळ माजली. बघ्यांची गर्दी वाढली. वाहतुक कोंडी झाली. एरवी पावत्या फाडणारे वाहतुक पोलिस मात्र आज गायब होते. आळंदी पोलिस ठिण्यातील पोलिस निरीक्षक,आणि माजी नगरसेवक डी डी भोसले यांनी काकडे याला समजावुन खाली उतरवले. आणि सर्वांच्या मनातील धाकधुक संपली.यावेळी रुग्णवाहिका आणि अग्निशमन गाडीही तैनात ठेवली होती.तब्बल सव्वा तासाच्या प्रयत्नाने काकडे याला टाकीवरुन उतरवण्यास वेळ लागला. काकडे याचे घरातील नातेवाईकही जमा झाले.त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करुन व जबाब घेवुन सोडण्यात आले.

# वर्षभरात पुणे जिल्ह्यात १४ कोटींचे अमली पदार्थ जप्त!

## पोलिसांच्या कारवाईत ५०४ आरोपी गजाआड

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अमली पदार्थ तस्कर ललित पाटील प्रकरण ताजे असतानाच पुणे शहर, जिल्ह्यात गेल्या वर्षभरात पोलिसांनी १४ कोटी ५५ लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. पुणे शहर, ग्रामीण, लोहमार्ग पोलीस, तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अमली पदार्थ विक्री प्रकरणात ५०४ आरोपींना अटक केली आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने अमली पदार्थ विक्री, तसेच तस्करांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्या अध्यक्षते खाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ विरोधी केंद्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत पोलीस अधीक्षक, उपवनसंरक्षक अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी, सहायक आयुक्त, समाजकल्याण, जिल्हा कृषी अधिकारी, वस्तू आणि सेवा कर विभागाचे आयुक्त, उपविभागीय दंडाधिकारी,



अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे अधीक्षक, पुणे, पिंपरी शहर पोलीस दलातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीची बैठक दरमहा घेण्यात येते. पुणे शहर, जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, तस्करी रोखण्यासाठी या समितीकडून उपाययोजना करण्यात आल्या आहेत. याबाबत पोलीस तसेच सर्व यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या दहा महिन्यात पुणे शहर, जिल्हा, आणि पिंपरी-चिंचवड शहर परिसरातून ऑक्टोबर महिना अखेरपर्यंत पोलिसांनी ४०९ कारवाया केल्या. या कारवाईत नऊ हजार ३५५ किलो ६८ ग्रॅम वजनाचे १४ कोटी ५५ लाख ३४ हजार २२३ रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

५०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाकडून औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची नियमित तपासणी सुरू करण्यात आली आहे. शाळा, महा विद्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अमली पदार्थ विक्रीबाबत माहिती असल्यास नागरिकांनी त्वरीत नजीकचे पोलीस ठाणे किंवा अमली पदार्थ विरोधी समितीतील सदस्यांकडे माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी केले आहे.